VOL- IX ISSUE- XII DECEMBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# विकास संकल्पनेचा सामाजिक बहिष्कारावरील परिणाम

**डॉ. रामराव धेनू चव्हाण**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव.

**प्रस्तावना :-**

विकासाच्या संकल्पनेकडे आज आंतरराष्ट्रीय पातळीवर एक प्रश्न म्हणून पाहिले जात आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने विकासाची परिभाषा अशी केली की, सामाजिक व्यवस्था, सामाजिक संरचना, संस्था आणि समाज उपयोगी सर्व सेवांची वाढती क्षमता जे की, सर्व संसाधनांचा वापर करण्यासाठी अनुकूल असा समाज परिवर्तन होणे. त्यामुळे समाजाचे जीवनमान उंचावणे, मूल्य व आर्थिक प्रगती, पैसा आणि संधीची समान वितरण होऊन समाज व्यवस्थेत स्थित्यंतरे घडून येणे म्हणजे विकास होय, असे सर्वसाधारणपणे सांगता येते. विकास आणि विकास प्रक्रियेत सामाजिक बहिष्कारचे वाढते प्रमाण जर लक्षात घेतले तर विकासाचे परिणाम हे समाज परिवर्तनावर झाले का, समाजात विषमता निर्माण करण्यासाठी व समाजामध्ये सामाजिक बहिष्कार निर्माण करण्यासाठी विकासाची प्रक्रिया समाजात रुजली गेली हे मात्र गुपित समजले नाही. कारण की विकास म्हटले की संपूर्ण समाजात उत्क्रांतीच्या दिशेने बदल होणे, समाजामध्ये स्थित्यंतरे घडवून येणे म्हणजे विकास असे मानत असताना एका बाजूला या विकासामुळे समाजात दुफळी निर्माण झाल्याचे दिसून येते. याचे कारण असे की, विकासामुळे काही लोकांनीच श्रीमंतीची कास धरली आणि काहींना विकासाच्या परिघाबाहेर ठेवण्यात आले. म्हणून समाजामध्ये विषमता निर्माण होऊन सामाजिक बहिष्कार प्रस्थापित होताना दिसून येतो. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधात विकासाचे सामाजिक बहिष्कारावर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) विकास ही संकल्पना समजून घेणे.
२) सामाजिक बहिष्कार संकल्पनेचा अभ्यास करणे.
३) विकासाचे सामाजिक बहिष्कारावरील परिणामांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून माहितीचे स्त्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ, मासिके आणि वर्तमानपत्रांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**विकास संकल्पनेचा अर्थ :-**

विकास म्हणजे काळाच्या ओघाबरोबर कुठल्याही गोष्टीत होणारे गुणात्मक व दर्जात्मक अधिक्य होय. विकास शारीरिक किंवा इतर कोणत्याही संस्थेत उदा. अर्थव्यवस्था, प्रणाली इत्यादीमध्ये होऊ शकतो. विकास हा सहसा एकेकाच्या पटीत मोजता येत नाही. त्यामुळे विकासाच्या मोजमापासाठी वेगळे निकष लावावे लागतात. काळानुसार अधिक्य होणे हे वाढ आणि विकास या दोन्हीमध्ये समान असले तरी वाढीत प्रमाणात्मक व विकासात गुणात्मक अधिक्य अभिप्रेत आहे. मोठ-मोठी महानगरे, शहरे, प्रचंड कारखाने आणि उद्योग तसेच आकाशात भिडणाऱ्या उंच-उंच इमारती, विज्ञानाने आणि तंत्रज्ञानाने मानवाला उपलब्ध करून दिलेल्या सोयीसुविधांची रेलचेल या गोष्टी आपण विकास या नावाने ओळखतो. ज्यावेळी "पश्चिमेकडील विकसित देश" असे आपण म्हणतो. त्यावेळी सुद्धा आपल्या मनात हाच अर्थ असतो. एका दृष्टीने तांत्रिक आणि औद्योगिक प्रगती म्हणजे विकास होय. अशी सर्वमान्य विकासाची व्याख्या मान्यता पावली आहे.

अर्थशास्त्राने विकास किंवा प्रगतीच्या मापनाचे काही निकष ठरविले आहेत. मोजमाप करावयाचे म्हणजे, ज्याचे

मापन करता येते. अशाच बाबीचा विचार अर्थशास्त्रात केला जातो. म्हणून हे मोजमाप फक्त भौतिक गोष्टीचेच होऊ शकते. माणूस वापरत असलेल्या विविध वस्तूंचे वजन व संख्या, त्यांची पैशातील किंमत अशाच गोष्टीचे मोजमाप करून त्या आधारे प्रगती किंवा विकास याविषयी बोलल्या जाते. विकास ह ा वेगवेगळ्या निकषांच्या आधारे समजून घेता येतो. आज भारताच्या स्वतंत्र्यपूर्वी आणि स्वातंत्र्य ोत्तर काळातील विकास ही प्रक्रिया समजून घेतल्यास असे निदर्शनास येते की, भारत देशातील संपूर्ण व्यवस्थित बदल झालेला आहे. परंतु त्याच पद्धतीने समाज व्यवस्थेत बदल झालेला दिसून येत नाही. कारण की काही समाजाची आर्थिक व्यवस्थेवर मक्तेदारी असल्यामुळे तो समाज केंद्रस्थानी आला आणि अत्यंत गरीब जनता आजही विकासाच्या प्रवाहापासून कोसोदूर आहे. म्हणून आजच्या २१ व्या शतकात सुध्दा फार मोठी विषमता समाजात असलेली आपणास दिसून येते. या विकासाच्या प्रक्रियेत समाजामध्ये सामाजिक बहिष्कार सर्वत्रिक स्वरूपात दिसून येते. आजही मागास, वंचित, दलित आणि विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या समाजावर अन्याय, अत्याचार, जुलूम होत असताना आढळून येते. काही ठिकाणी प्रभुत्वशाली जाती गटाकडून कनिष्ठ जाती समूहावर सामाजिक बहिष्कार होत असलेला दिसून येत आहे. विकासाची ध्येय जरी साध्य होत असली तरी सामान्य जनतेसाठी या विकासाचे ते साक्षी होऊ शकत नाही. कारण की, आजही त्यांना विकासापासून वंचित ठेवण्याचे प्रयत्न समाजात होत असलेल दिसून येते.

**सामाजिक बहिष्काराचा अर्थ :-**

"**स**माजाच्या सदस्यांमध्ये कोणताही सामाजिक भेदभाव करणारी कृत्य मग ते मौखिक अथवा लेखी स्वरूपातील असो हे सर्व कृत्य म्हणजे मानवी बहिष्कार होय."

जर कोणताही सदस्य किंवा सदस्यांचा समूह पुढीलपैकी कोणतीही कृत्य े करील, कोणत्याही सामाजिक सदस्यांच्या समूहाने समाजातील सदस्यांवर सामाजिक बहिष्कार घातल्याचे समजण्यात येईल, म्हणजेच -

**०१)** जर तो आपल्या समाजातील कोणत्याही सदस्यास कोणत्याही सामाजिक, धार्मिक, रूढी, रितीरिवाज व विधी यांचे पालन करण्यास किंवा सामाजिक, धार्मिक व ा सामूहिक कार्यक्रम, प्रार्थना, सभा, समाज मेळावा व मिरवणूक यामध्ये सहभागी होण्यास प्रतिबंध करेल किंवा अडथळा करील किंवा प्रतिबंध व अडथळा करण्याची व्यवस्था करील;

**०२)** जर तो, त्याच्या स्वतःच्या समाजातील सदस्य ा ंचे सर्वसाधारणपणे पार पडतात असे विवाह, अंत्यविधी, इतर धार्मिक समारंभ आणि विधी संस्कार पार पाडण्याचा त्याच्या समाजातील कोणत्याही सदस्याचा हक्क नाकारेल किंवा तो ना कबूल करील किंवा तो नाकारण्याची किंवा नाकबूल करण्याची व्यवस्था कर ील;

**०३)** जर तो आपल्या समाजातील सदस्याचे जगणे दु:खी व कष्टी होईल. अशा पध्दतीने त्या सदस्याला त्या समाजामध्ये सहभागी करून घेण्यास टाळाटाळ करील, नकार देईल किंवा अशा सदस्यांशी असलेले सामाजिक व व्यावसायिक संबंध तोडतील;

अशाप्रकारे अनेक निकष या सामाजिक बहिष्कार ात समाविष्ट करण्यात आली आहेत. यातील कोणत्याही कृत्यांशी संबंधित कृत्य एक व्यक्ती अथवा समाज व समुदायाकडून घडून आल्यास त्यांना कायदेशीर शिक्षा केली जाते. या सामाजिक बहिष्कार कायद्यामुळे समाजातील सर्व सामान्य जनतेला सद्यपरिस्थितीत मोकळेपणाने जीवन जगता येते.

सामाजिक बहिष्काराचा सर्वाधिक प्रभाव हा भटक्या, विमुक्त व आदिवासी समाजावर असतो. या समाजात जाती-पंचायतीचे प्राबल्य फार मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून जात ी बाह्य वर्तन केल्यास त्या आरोपीस शिक्षा मिळते. त्यामुळे जातपंचायत ही जातीची न्याय संस्थाच नाही, तर जातीमधील व्यक्तींच्या व्यवहाराचे नियम निर्माण करणारी ती एक शासन यंत्रणाही आहे. परंतु जातपंचायत विरोधी कायदा अस्तित्वात आल्यानंतर त्यांना मुख्य प्रवाहात यावे लागेल. म्हणजेच कोणत्याही अन्यायाविरोधात दाद मागण्यासाठी पोलिसात तक्रार द्यावी लागेल. न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागतील. सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायद्याच्या प्रमुख उद्देशा ंपैकी शोषण थांबवावे हा एक महत्त्वाचा उद्देश आहे. तर या वर्गातील व्यक्ती पोलीस ठाणे किंवा न्यायालयात गेल्यास त्याचे मानसिक व आर्थिक शोषण होणार नाही. याची हमी देण्याची जबाबदारी राज्यघटनेनुसार शासन-प्रशासनावर आहे. तरीदेखील नव्या व्यवस्थेत त्यांचे शोषण थांबावे,

यासाठी पूर्वतयारी आवश्यक आहे. तेव्हा मात्र सामाजिक बहिष्कार हा कालसापेक्ष कमी-कमी होताना दिसून येईल.

**सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा व अंनिसचे योगदान :-**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीने शासनाला अनेक पुरावे सादर करून सामाजिक बहिष्कार कायदा मंजूर करून घेतला आहे. मागासवर्गीय व भटक्या जाती-जमातीतील जातपंचायतीचे निर्मूलन करण्याचे अनमोल कार्य महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केले. विशेष म्हणजे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष मा. अविनाश पाटील यांनी समाज परिवर्तनाचे कार्य केले. सामाजिक बहिष्कार हे जातपंचायतीत मोठ्या प्रमाणात घडून येत. त्यामुळे अंनिसने महाराष्ट्रातील १५ जातपंचायती बरखास्त करण्याचे अभियान राबविले. त्यात त्यांना पोलीस यंत्रणेचे उत्तम सहकार्य मिळाले. यानिमित्ताने राज्यभरातील जातपंचायतीचा कारभार चव्हाट्यावर आला. अनेक पीडित कुटुंबे आपले व्यथा मांडू लागले. त्यात अशिक्षित जसे होते, तसे काही सुशिक्षितही होते. या विरोधात संतप्त भावना व्यक्त होऊ लागल्यानंतर अनेक जातपंचायतीनी स्वतःहून त्या बरखास्त करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे आजवर राज्यातील भटके, जोगी, मसन जोगी, आदिवासी गोंड, वैदु, नागपंथी, डावरी, गोसावी, गोपाळ इत्यादी सुमारे १५ जातपंचायती बरखास्त करण्यात आल्या आहेत.

आज सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायद्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये भीती निर्माण झालेली दिसून येते. त्यामुळे सामाजिक बहिष्काराची कृत्य घडून येण्याच प्रमाण कमी होताना दिसून येत आहे. याचे कारण अशी की सर्वांना हे कळून चुकले आहे की, सामाजिक बहिष्कार टाकणे आता कायदेशीर गुन्हा आहे. म्हणून जागरूक लोक आता सावध होऊन या प्रक्रियेतून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतात.

**विकासाचे सामाजिक बहिष्कारा वरील परिणाम :-**

एकविसाव्या शतकात आज भारतभर विविध क्षेत्रात परिवर्तन होत आहेत. भारतीय समाजात किंवा अन्य देशातही दिवसेंदिवस विकास होत आहे. परंतु या विकासाच्या प्रक्रियेत आजही काही अन्य घटक विकासापासून वंचित आहे. त्यामुळे प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या समाज व्यवस्थेतही अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. सामाजिक बहिष्काराशी संबंधित काही समस्या समाजात सहजरीत्या निर्माण होतात. त्यात प्रामुख्याने बेकारी, निकृष्ट घरांचा दर्जा, गुन्ह्याचे वाढते प्रमाण, आरोग्यविषयक समस्या व कौटुंबिक विघटनात्मक समस्यांचा समावेश होतो. विकास आणि सामाजिक बहिष्कार या परस्परविरोधी बाजू आहेत. कारण विकास हा संपूर्ण समाजाचा होत असताना त्यात काही वंचित घटक हे विकासापासून दूर राहतात. विशेषतः विकासाच्या प्रक्रियेत येऊ शकणाऱ्या समुदायाला विकासाच्या प्रक्रियेत प्रवेश मिळत नाही. जात, धर्म, वंश, भाषा, संस्कृती इत्यादी घटकांमुळे त्यांना समाज व्यवस्थेत विषमतेच्या कारणावरून त्यांचे शोषण करण्याच प्रयत्न केल जात. म्हणून विकासाचे सामाजिक बहिष्कारवर परिणाम झालेले आढळून येते. याचे कारण असे की, सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करणाऱ्या घटकाला प्रभुत्वशाली समाजातील काही घटक बहिष्कृत करण्याचा प्रयत्न करतात. विकास प्रक्रियेत मूठभर लोकांच्या हातात सत्ता केंद्रे असून त्यांच्या अधिपत्याखाली अन्याय समुदायातील लोक कार्य करीत आहेत. पण अत्यंत दयनीय अवस्थेत जीवन जगणाऱ्या दलित, मागास, भटक्या जाती-जमातीतील लोकांवर सामाजिक बहिष्कार उच्चभ्रू लोकांच्या माध्यमातून समाजात घडून येत असते. समाजात आजही श्रीमंत हा श्रीमंत होत असून गरीब हा गरीबच होत आहे. म्हणून ही सामाजिक व्यवस्था नष्ट होण्यासाठी सामाजिक बहिष्कार सर्व समाजातून नष्ट होणे फार गरजेचे आहे. तेव्हा मात्र विकासाचे सर्वांना समान हक्कदार बनता येईल. समाजातील विषमतावादी दृष्टिकोन नष्ट होईल व समाजातील सर्व जाती-जमातींचा सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य होऊन सर्व समुदाय प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतील. सामाजिक बहिष्कार ही कोणत्याही समुदायावर व व्यक्तीवर समाजात घडून येऊच नये. यासाठी प्रयत्न होणे व एकसंघ समाजाची निर्मिती करणे ही आजच्या काळाची गरज आहे. या पद्धतीने समाजाचा विकास होऊ शकतो. विकासाचे परिणाम संपूर्ण समाजावर सकारात्मक पद्धतीने झाल्यावर सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया जलद गतीने होऊ शकते.

**निष्कर्ष :-**

विकास आणि विकासाचे सामाजिक बहिष्कारावरील परिणाम समजून घेताना असे लक्षात येते की,

आज विकास या प्रक्रियेत सारखेपणा दिसून येत नाही. कारण की, काही मानवी समुदाय हा भांडवलदार म्हणून पुढे येतो तर काही विकास प्रक्रियेच्या परिघाच्या बाहेर असलेले दिसून येते. जर समाजामध्ये असलेली सामाजिक बहिष्कारांची प्रक्रिया समूळ नष्ट करावयाची असेल तर विकासाच्या बाबतीत समतोलत्व साधने फार आवश्यक आहे. विकासापासून दूर असलेल्या समुदायाला केंद्रस्थानी आणणे व त्यांच्यात विकास घडवून परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे आहे. तसेच विकसित समुदायांनी सोबत घेऊन परिवर्तन करण्यासाठी एकसंघ प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे विषमतावादी समाजव्यवस्था नष्ट होऊन सामाजिक बहिष्कार याची समस्या देखील समाजातून समूळ नष्ट होऊ शकते. अशाप्रकारे वरील विश्लेषणावरून स्पष्ट जाणवते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) गोपी कृष्ण प्रसाद, (१९९९), विकास का समाजशास्त्र रावत पब्लिकेशन्स,जयपुर.

२) भांगे कालिदास, चांगदेव मुंडे, (१९९९), विकासाचे समाजशास्त्र, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

३) Chalam K. S. , (2011), Economic Reform and Social Exclusion: Impact of Liberalisation on Marginalized Groups in India, Sage Publication.

४) Jane Mathieson; Social Exclusion Meaning, Measurment and Experience and Links to health Inequalities A Review of Literature.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com